# महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद)

## जिल्हा अभियान व्यवस्थापन कक्ष,पालघर

साई आशिर्वाद अपार्टमेंट, लोकमान्य नगर, कचेरी रोड,पालघर-401404

**Email-** dmmupalghar@gmail.comफोन नं.02525-251260

---

## कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या पदासाठी जाहीरात

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, पालघर अंतर्गत पालघर, तलासरी, वसई, वाडा, डहाणु, विक्रमगड, डहाणु तालुक्यात भरावयाच्या क्लस्टरको-ऑर्डीनेटर, प्रशासन व लेखा सहाय्यक, डेटाईन्ट्रीऑपरेटर आणि शिपाई या पदासाठी पात्र उमेदवारांकडुन दि.25/10/2018 ते दि.11/11/2018 पर्यंत ऑनलाईनपध्दतीनेअर्ज मागविण्यात येत आहेत.

परीक्षेचा निश्चित दिनांक हा महापरीक्षा पोर्टल यांचे www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल आणि याची माहिती सर्व नोंदणीकृत उमेदवारांना कळवण्यात येईल .

| अ.क्रं | पदनाम | एकुण पदांची संख्या | नियुक्तीचे ठिकाण | दरमहाएकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|
| 1. | क्लस्टरको-ऑर्डीनेटर | 41 | पालघर,तलासरी,वसई,वाडा, डहाणु,विक्रमगड,मोखाडा. | 20,500/- |

| पदांचे आरक्षण | अनु. जाती | अनु.जमाती | वि. जा.(अ) - | भ. ज.(ब) | भ. ज.(क ) | भ. ज.(ड ) | इतर मागास वर्ग | वि.मा .प्र. | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पद संख्या 41 | 3 | 4 | 2 | 0 | 1 | 1 | 3 | 1 | 26 | 41 |
| सर्वसाधारण | 2 | 2 | 2 | 0 | 1 | 1 | 2 | 1 | 8 | 19 |
| महिला 30% | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 8 | 11 |
| अपंग 3% | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| खेळाडू 5 % | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| माजी सैनिक 15% | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 4 | 5 |
| प्रकल्पग्रस्त 5 % | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| भुकंपग्रस्त 2 % | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 |
| अंशकालीन 10% | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 | 2 |
| एकुण | 3 | 4 | 2 | 0 | 1 | 1 | 3 | 1 | 26 | 41 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | प्रशासन व लेखा सहाय्यक | 06 | खुले पद,-1,<br>अनुसूचित जाती-1,<br>अनुसंचित जमाती- 2 पैकी1महिला,<br>भटक्याजाती- 1,<br>इतर मागास प्रवर्ग- 1 | तलासरी,वसई, वाडा, विक्रमगड, मोखाडा, डहाणु | 15,000/- |
| 3 | डेटाएन्ट्रीऑपरेटर | 05 | अनुसूचित जाती- 1,<br>अनुसंचित जमाती- 1,<br>भटक्या जाती- 1,<br>खुले पद- 2 | वसई, वाडा, विक्रमगड, मोखाडा, डहाणु | 10,000/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 4 | शिपाई | 05 | खुले पद - 2पैकी 1 महिला,<br>अनुसूचित जाती - 1,<br>अनुसुचित जमाती महिला -1,<br>इतर मागास प्रवर्ग- 1 | वसई, वाडा, विक्रमगड, मोखाडा, डहाणु | 8,000/- |

## किमान शैक्षणिक पात्रता व अनुभव

| पदनाम | किमान शैक्षणिक पात्रता | अनुभव |
|---|---|---|
| क्लस्टरको-ऑर्डीनेटर | कोणत्याही शाखेतील पदवीधर,समाजकार्य,कृषी यातील पदवी तसेच समाजकार्यएम.बि.ए.,ग्रामीण विकास, ग्रामीण व्यवस्थापन यातील पदव्युत्तर पदवी यांना प्राधान्य. | महिला,अपंग,अनुसुचितजाती,जमाती आणि इतर मागास वर्गातील महिलांचे सामाजिक संघटन व संस्थियबांधणी,ग्रामीणविकास,गरीबीनिर्मुलनउपजिविकावृध्दी कार्यक्रम इत्यादी क्षेत्रातील शासकिय, निमशासकिय, स्वंयसेवी संस्था मधील किमान 3 वर्षाचा अनुभव. |

| पदनाम | किमान शैक्षणिक पात्रता | अनुभव |
|---|---|---|
| प्रशासन व लेखा सहाय्यक | वाणिज्य शाखेतील पदवी (B.Com), आणि इंग्रजी टायपिंग वेग 40 wpm, मराठी टायपिंग वेग 30 wpm परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक, Tally व MS-CIT किंवा समकक्ष परीक्षाउत्तीर्णआवश्यक | किमान 3 वर्ष प्रशासकिय व लेखाविषयक कामाचा अनुभव |
| डेटाएन्ट्रीऑपरेटर | माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्णआणि इंग्रजी टायपिंग वेग 40 wpm, मराठी टायपिंग वेग 30 wpm परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक व MS-CIT किंवा समकक्ष परीक्षाउत्तीर्ण असणे आवश्यक | माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर किमान 3 वर्षे डेटाएन्ट्रीऑपरेटर(संगणक परिचालन)कामाचा अनुभव |
| शिपाई | 10 वी ची परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. | किमान 3 वर्षे शासकीय कार्यालय/संस्था/ कंपनी मधील कामाचा अनुभव |

| | | |
|---|---|---|
| ऑनलाईन अर्ज स्विकारण्याची तारीख | दिनांक: 25/10 /2018 | |
| ऑनलाईन अर्ज भरण्याची शेवटची तारीख | दिनांक- 11/11 /2018 | |
| ऑनलाईन अर्ज करणे, परीक्षेचे प्रवेशपत्र डाउनलोड करणे, परीक्षा दिनांक, स्थळ इ.माहिती मिळणेसाठी संकेतस्थळ | www.mahapariksha.gov.in | |
| परीक्षा शुल्क | मागासवर्गीय उमेदवारांकरिता | खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरिता |
| | रक्कम रु. 274/- | रक्कम रु. 374/- |
| हेल्पलाईन क्रमांक | 1800-3000-7766 | |

परीक्षेचा निश्चित दिनांक हा महापरीक्षा पोर्टल यांचे www.mahapariksha.gov.in या

संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल आणि याची माहिती सर्व नोंदणीकृत उमेदवारांना कळवण्यात येईल .

## नियुक्ती बाबत अटी व शर्ती -

1.शासन परिपत्रक क्रमांक:मजिअ-2013प्र.क्र.116/योजना-3 दि. 9 मे, 2013 अन्वये वरील पदांमध्ये महिलांसाठी 30% आरक्षण राखीव ठेवण्यात आले आहे.

2.सदरची पदे हि निव्वळ कंत्राटी तत्वावरील असुन 11 महिन्यांच्या करार कालावधीकरिता आहेत. त्यापुढील मुदतवाढ ही कामाचे मुल्यमापन करुन करण्यात येईल.

3. उमेदवाराचे वय खुला प्रवर्ग- 38 वर्ष. शासकीय नियमानुसार प्रवर्गनिहाय शिथिलक्षम राहील.

4. उमेदवारांनी त्यांचे अर्ज www.mahapariksha.gov.in या संकेत स्थळावरुन Online भरावयाचे आहे.

5.अनुक्रमांक 1 च्या क्लस्टरको-ऑर्डीनेटर पद भरतीकरिता 80 गुणांची संगणक आधारित (Computer Based) परीक्षा घेण्यात येईल.सदरक्लस्टरको-ऑर्डीनेटर यांच्या परिक्षेमध्ये मराठी-14 गुण इंग्रजी- 14 गुण, सामान्य ज्ञान-14 गुण, बौध्दीक चाचणी-14 गुण, सामाजिक शास्त्रे-14 गुण व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नतीअभियान- 10 गुण याप्रमाणे गुण ठेवण्यात येतील. वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रत्येक प्रश्नास एक गुण असे 80 प्रश्न असतील. मुलाखतीस २० गुण ठेवण्यात आलेले आहेत.सदर परीक्षा मराठी भाषेत घेण्यात येईल. गुणानुक्रमे उमेदवारांची निवड करण्यात येईल.

6. अनुक्रमांक 2, 3, 4 च्या प्रशासन व लेखा सहाय्यक, डेटाएन्ट्रीऑपरेटर आणि शिपाई पद भरतीकरिता 100 गुणांची संगणक आधारित (Computer Based) परीक्षा घेण्यात येईल. परीक्षेमध्ये मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान, बौध्दिक चाचणी व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान या विषयावरील प्रत्येकी 20 गुण ठेवण्यात येतील. गुणानुक्रमे उमेदवारांची निवड करण्यात येईल.वस्तुनिष्ठबहुपर्यायी प्रत्येक प्रश्नास एक गुण असे 100 प्रश्न असतील.

7. सदर पदभरतीसाठी पात्र उमेदवारांची यादी, परीक्षा दिनांक, परीक्षा वेळ व ठिकाण इत्यादीसाठी www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर आणि एमएसआरएलएम पालघरजिल्हा कार्यालयाच्या नोटीसबोर्डवर लावण्यात येतील. त्यासाठी कोणताही वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही. परीक्षा प्रवेश पत्र उमेदवारांने वरील संकेतस्तरावरुन डाउनलोड करावेत.

8. परीक्षेस कोणत्याही प्रकारचा प्रवास खर्च अथवा भत्ता अनुज्ञेय नाही.

9. शासन सेवा व शर्ती खाली सदरची नेमणूक नसल्याने MSRLM चे HR Manual मधील अटी व शर्ती लागु राहतील.

10.सविस्तर जाहिरात पाहण्याकरिता www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळाला भेट दयावी.

11.पद भरती व अंतीम निवड यादी करण्याचे सर्व अधिकार निवड समितीला राहतील.

12. सदरच्या पदासाठी ऑनलाईनअर्ज स्विकारण्याचीअंतीम तारीख11/11/2018 रात्री 11.59 मिनिटांपर्यंत.

| **अर्ज भरण्याची कार्यपद्धती आणि सुचना :-** | |
|---|---|
| **1)** | उमेदवाराला www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर लॉगइन करावे लागेल. उमेदवाराने आपल्या उजव्या बाजूला असलेल्या 'सूचना' या पर्यायावर क्लिक करावे. तिथून उमेदवाराला थेट नोंदणीच्या पोर्टलवर नेले जाईल. पहिल्यांदाच नोंदणी केली जात असल्यास उमेदवाराने नोंदणीच्या पर्यायावर क्लिक करून यूजर नेम, पासवर्ड आणि इमेल आयडी टाकावा. उमेदवाराला त्यानंतर त्याच्या/तिच्या प्रमाणित इमेल आयडीवर सक्रीयतेची लिंक मिळेल जी त्यांच्या साइनअपशी संबंधित असेल. उमेदवाराने त्याचे/तिचे खाते सक्रीय |

| | |
|---|---|
| | करण्यासाठी त्याच्या/तिच्या इमेल आयडीवर मिळालेल्या सक्रीयतेच्या लिंकवर क्लिक करावे. उमेदवाराने त्याची/तिची लॉगइनची माहिती गोपनीय ठेवावी. एकदा खाते सक्रीय झाले की, उमेदवाराला त्यांच्या नोंदणी पोर्टलचे युजरनेम आणि पासवर्ड वापरून केव्हाही लॉग ऑन होता येईल<br>टीप : USERNAME आणि PASSWORD जतन करण्याची जबाबदारी उमेदवाराची असेल . |
| **2)** | उमेदवाराचे नाव, वडीलांचे, पतीचे नाव, आडनाव, वडिलांचे नाव, आईचे नाव, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक, छायाचित्र, स्वाक्षरी ही मुलभूत माहिती आहे जी उमेदवाराला सविस्तर द्यावी लागेल. |
| **3)** | छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड करण्यासंबंधी माहिती - कृपया उंची आणि रुंदी प्रत्येकी 200 pixel असलेले छायाचित्र स्कॅन करुन अपलोड करा आणि अर्जामध्ये अपलोड करा. प्रतिमेची उंची 60 पिक्सल आणि रुंदी 140 पिक्सल असावी. प्रतिमेचे आकारमान 3 KB ते 50 KB च्या दरम्यान असावे. (टिप :- उमेदवाराने अलीकडील छायाचित्र (फोटोग्राफ) अपलोड करणे आवश्यक आहे .) |
| **4)** | पत्ता टाकण्यासाठी उमेदवाराने आपल्या पत्त्याचा प्रकार निश्चित करावा. उदा. कायमस्वरुपी पत्ता, तात्पुरता पत्ता किंवा दोन्ही आणि त्यानुसार आपले गाव, पोस्ट ऑफिस, राज्य, जिल्हा, पिन कोड इ.सहित माहिती भरावी. |
| **5)** | त्यानंतर उमेदवाराने अतिरिक्त माहितीच्या पर्यायावर क्लिक करावे आणि आपल्या जात प्रवर्गाबद्दल माहिती भरावी. उमेदवाराकडे जात प्रमाणपत्र असल्यास त्याबद्दल विचारणा केली जाईल. असल्यास ड्रॉपडाऊन मधून त्याने / तिने आपला जात प्रवर्ग निवडावा. |
| **6)** | ज्यांच्याकडे आधार क्रमांक आहे त्यांनी तत्संबंधी माहिती भरावी, तसेच उमेदवाराने आधार क्रमांक/ आधार नोंदणी क्रमांक याबद्दलची माहिती द्यावी . तसेच उमेदवार शारीरिकदृष्ट्या विकलांग असल्यास त्याला आपल्या विकलांगतेचा प्रकार निवडणे आवश्यक आहे (कृपया पदानुसार लागू असलेल्या शारीरिक विकलांगता प्रकारासाठी जाहिरात पहा). |
| **7)** | तसेच मराठीभाषेतील प्राविण्य, MS-CIT प्रमाणपत्र , आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे पाल्य, आणि इतर समांतर आरक्षण (लागू असल्यास ) यासंबंधीची माहिती द्यावी लागेल . |
| **8)** | शैक्षणिक माहितीच्या जागी उमेदवाराने आपली सविस्तर शैक्षणिक माहिती भरावी. शैक्षणिक पात्रतेमध्ये एस.एस.सी. ची माहिती देणे अनिवार्य आहे. तसेच पदाच्या अर्हतेनुसार आवश्यक ती शैक्षणिक माहिती देणे आवश्यक आहे तरच आपणास त्या पदासाठी अर्ज करता येईल. |
| **9)** | एकदा शैक्षणिक तपशिल प्रविष्ट केले की अर्जदार पुढे या बटणावर क्लिक रावे लागेल, त्या बटणावर क्लिक केल्यानंतर अर्जदाराकडून पुष्टीची विनंती केली जाईल की त्यांनी ते बटण क्लिक केल्यास मागील तपशील संपादित करण्याची परवानगी दिली जाणार नाही. |
| **10)** | आता उमेदवारास पदांची निवड करावी लागेल. अर्ज सादर केल्यानंतर जर उमेदवारास उर्वरित पदांसाठी अर्ज करण्याची इच्छा असल्यास तेच USERNAME आणि PASSWORD वापरून उर्वरित पदांसाठी अर्ज करू शकतो. त्यासाठी दुसऱ्यांदा वेगळा अर्ज करण्याची आवश्यकता नाही. येथे पदाचे विभाजन ४ वेगवेगळ्या ग्रुपमध्ये करण्यात आले आहे. एका ग्रुपमध्ये नमूद करण्यात आलेल्या पदांसाठी परीक्षा ही एकाच वेळी सर्वत्र घेण्यात येणार आहे. उमेदवार हा एका ग्रुप मध्ये एक याप्रमाणे जास्तीत जास्त ४ पदांसाठी अर्ज करू शकतो. |

| **गट अ** | **गट ब** |
|---|---|
| 1) Cluster Co-ordinator_Thane | 1) Administration and Account Assistant _Thane |
| 2) Cluster Co-ordinator_Palghar | 2) Administration and Account Assistant_Palghar |
| | |
| **गट क** | **गट ड** |
| 1) Data Entry Operator_Thane | 1) Peon_Thane |

| | | |
|---|---|---|
| | 2) Data Entry Operator_Palghar | 2) Peon_Palghar |
| **11)** | त्यानंतर उमेदवारास सर्व पदांसाठी आवश्यक असलेली पात्रतेबद्दलची माहिती देऊन ती सेव्ह करणे आवश्यक आहे. | |
| **12)** | उमेदवाराने नोंदणी अर्जामध्ये दिल्याप्रमाणे परिक्षा केंद्राकरिता तीन प्राधान्यक्रम निवडू शकतो. | |
| **13)** | उमेदवाराने सगळया नियम व अटी वाचून मान्यता दर्शविण्यासाठी दिलेल्या जागी क्लिक करावे. त्यानंतर ऑनलाईन पद्धतीने आवश्यक तो परीक्षा शुल्क भरणा करावा. परीक्षेचा शुल्क भरणा हा फक्त ऑनलाईन पद्धतीने (क्रेडिट कार्ड , डेबिट कार्ड , ऑनलाईन बँकिंग , भीम upi ) करता येईल . मान्यता दर्शविल्यानंतरच अर्ज दाखल करण्यासाठीचा सबमिट हा पर्याय उपलब्ध होईल. उमेदवाराला त्याचा अर्ज डाऊनलोड किंवा प्रिंट करण्याचा पर्याय असेल. | |
| **14)** | ऑनलाईन अर्ज स्विकारण्याच्या अंतिम तारखेस मध्यरात्री 12.00 वाजल्यानंतर संकेतस्थळावरील लिंक बंद केली जाईल. | |
| **15)** | जर कोणत्याही उमेदवाराने एकापेक्षा अधिक लॉगिन आयडीसह नोंदणी केली असेल तर उमेदवारांची पहिली यशस्वी नोंदणी फक्त पुढील प्रक्रिया जसे हॉल तिकीट, परीक्षेत उपस्थिती, गुणवत्ता यादी आणि अन्य संबंधित प्रक्रियांसाठी विचारात घेण्यात येईल, कोणत्याही डुप्लीकेट नोंदणीस अवैध नोंदणी मानले जाईल आणि कोणत्याही प्रकारचे पैसे परतफेड केले जाणार नाहीत. उमेदवाराद्वारे प्रथम यशस्वी नोंदणीमध्ये काही चुकीची माहिती देण्यात आली असेल तर कृपया या विषयाबद्दलची योग्य प्रक्रिया जाणून घेण्यासाठी enquiry@mahapariksha.gov.in वर लिहा किंवा टोल फ्री नंबर 180030007766 वर कॉल करा.<br>**नोंद :-** नोंदणी मधील तपशील जसे की वापरकर्ता नाव (USERNAME), ई मेल आयडी, प्रवर्ग आरक्षण (लागू, समांतर किंवा प्रवर्ग आरक्षण) , पसंतीचे स्थान, जन्मतारीख उमेदवाराचे छायाचित्र (फोटोग्राफ) आणि स्वाक्षरी इत्यादी फॉर्म सादर केल्यानंतर बदलण्याची परवानगी दिली जाणार नाही. | |
| **अर्जातील माहितीचे पूर्वावलोकन:-** | | |
| **1)** | युजरनेम आणि पासवर्ड वापरुन लॉगइन केल्यावर उमेदवार आपला संक्षिप्त अर्ज पाहू शकतो. | |
| **2)** | अर्ज प्रिंट करण्यासाठी **"प्रिंट प्रिव्हयू"** या पर्यायावर क्लिक करा. उमेदवाराने पुढील प्रक्रियेसाठी आपल्या अर्जाची प्रत (Soft/Hard Copy) आपल्याबरोबर ठेवणे गरजेचे आहे. | |

मुख्य कार्यकारी अधिकारी
जि.प तथा जिल्हा अभियान संचालक,
एमएसआरएलएम पालघर